**१. वीज अधिनियम २००३ चे कलम १६१ नुसार विद्युत अपघाताबाबत चौकशी करणे आणि त्याचा अहवाल अहवाल जेव्हा आवश्यक असेल तेव्हा वीज वितरण कंपनी ,पोलिस, न्यायालयीन विभागाकडे प्रदान करणे :-**

अ) वीज हा आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग झाला आहे. ती चैनीची वस्तु नसून अत्यावश्यक बाब आहे. बाजारात दररोज नवनवीन विजेची साधन यंत्रे आणि उपकरणे येत आहेत. दिवसागणिक आपली अवलंबिता त्यावर वाढत आहे. त्याचवेळी विजेचे धक्क्यामुळे होणारी मानवी जिवित हानी सुद्धा वाढत आहे. महाराष्ट्रात अंदाजे दरवर्षी विजेच्या धक्क्याने 1500 प्राणांतिक अपघात घडतात, त्यामध्ये जास्तीत जास्त अपघात हे ग्रामीण भागात घडतात. विजेचे शॉर्ट सर्किट होऊन आग लागल्याने कोट्यावधी रुपयांची मालमत्ता नष्ट होते. यापैकी बहुतेक अपघात वीज वापरणाऱ्यांचे अज्ञान, निष्काळजीपणा व अति-आत्मविश्वास यामुळे होतात.

आ) विद्युत अपघाताबाबत चौकशी करणे हे विभागाचे एक मुख्य काम आहे. मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी जिवित हानी झालेल्या तसेच न झालेल्या आणि विजेमुळे आग लागलेल्या विद्युत अपघातांची मुळ कारणे शोधून काढण्यासाठी चौकशी करतात. अपघातास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्यासाठी त्याचा अहवाल मागणीनुसार वीज वितरण कंपनी ,पोलिस, न्यायालयीन विभागाकडे पाठवला जातो.

------------------------------------------------------------------------------------------------------------

**1. Investigate the electrical accidents and provide the its report to the supplier company, police and judicial department as and when necessary as per section 161 of Electricity Act 2003 :-**

**a)** Electricity is an integral part of our lives. It is no more a luxury but essential need. Every day new electrical appliances & gadgets are coming in market. Our dependency on these appliances is increasing day by day. At the same time loss of human lives due to electrical shocks is increasing every year. On an average 1500 fatal accidents occur in Maharashtra State due to electrocution; most of which occur in rural part of the state. Property worth crores of rupees is lost in fire due to

electrical short circuits. Most of these incidences occur either due to ignorance or negligence or overconfidence from the part of users.

**b)** The important function of the department is to conduct inquiry of electrical accidents. All fatal and non fatal electrical accidents related to human being and animal and fire accidents due to electricity are investigated by the field officers to find out the root cause of electrical accidents. The inquiry report is provided to the electricity supply company, police and judicial department as demanded for necessary action against the persons responsible for the electrical accident.